

# चला करूया व्यक्तिगत आर्थिक नियोजन

## • Personal Financial Planning •

### नियोजन करण्यात अपयशी ठरतात, ते अपयशी ठरण्यात नियोजन करतात

प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या जीवनाचे रहस्य पाहिल्यास त्याच्या कार्यातील काटेकोरपणे नियोजन व प्रत्यक्षात केलेले त्यावरील कार्य महत्त्वाचे ठरते. कारण नियोजन असेल तर मोठमोठी कामे सहजपणे पार पडतात. मात्र नियोजन नसेल छोट्या छोट्या कार्यामध्ये फार मोठी शक्ती खर्च करावी लागते. परिणामी वेळ अन् पैसा दोन्ही व्यर्थ जाताना दिसतात. आपल्या आयुष्यात येणारा पैसा व्यर्थ जाऊ नये यासाठी व्यक्तिगत आर्थिक नियोजन महत्त्वाचे ठरते. हे नियोजन व्यवस्थापन शास्त्राशी निगडित संकल्पना आहे. मात्र हे व्यवस्थापन प्रत्येकाच्या जीवनात करिअर (पैशाची निर्मिती) सुरू झाल्याबरोबर सुरुवातीला समजावून घेणे फार महत्त्वाचे आहे. आर्थिक ताळमेळ कसा घालावा, पैशाचे प्रभावी व्यवस्थापन कसे करावे, याबाबत फारशी माहिती कोणत्याही शैक्षणिक अभ्यासक्रमात आढळत नाही. ज्यावेळी जीवनामध्ये पैशाचा प्रवाह नियमितपणे चालू होतो, त्याचवेळी मनात इच्छा व गरजांचा आक्रमकपणा चालू होतो. खरी जीवनाची कसोटी इथे सुरू होते... अवास्तव खर्च व अवांतर इच्छांना मुरड घालता आला तरच या आयुष्यात यशस्वी होऊ शकतो...

जीवनात तुम्ही गरजेला प्राधान्य द्याल तर... जीवनात येणाऱ्या संपत्तीचे संपादन, संवर्धन, संरक्षण, संयोजन अन् सातत्य घडेल... त्यामुळे जीवनात सुख-समृद्धी, समाधान लाभेल. जर तुम्ही आपल्या इच्छांना प्राधान्य द्यात तर...

आपल्याकडून असंपादन, असंरक्षण, असंयोजन घडत जाईल व काळाच्या ओघाने भविष्यात मात्र ऋण, रोग, दारिद्र्य अन् असंतोष आपल्या वाट्याला येईल... मात्र भविष्यात त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.

पैशाची कमतरता उधारी, कर्जबाजारीपणामुळे, कुटुंबात कलहयुक्त वातावरणाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे, स्वतःच्या अविचार-अज्ञानामुळे आलेली असते, हे पुढे गेल्यानंतर आयुष्याच्या मध्यावधीत किंवा अंतिम टप्प्यात लक्षात येते. त्यावेळी वेळ निघून गेलेली दिसते.

जमा व खर्च या जीवनातील महत्त्वाच्या रेषा आहेत. पण प्रत्येकाच्या आयुष्यात खर्चाची रेषा फार मोठी असते. (मनुष्याच्या जन्मापासून खर्च चालू होतो, तो मृत्यूनंतरही संपत नाही) व खर्चाची गती मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त असते (आपल्या कुटुंबातील इतरांच्या खर्चामुळे) मात्र उत्पन्न निर्मितीचा कालावधी वय २५ ते ६० वर्षापर्यंत मर्यादित असतो, म्हणून तरुणपणी योग्य वेळी आर्थिकतेचे धडे घेण्यासाठी शहाणपण दाखवावे लागते.

खरं तर ध्येयामुळे प्रत्येकाचे जीवन सामर्थ्यशाली बनते. मात्र आपल ध्येय काय आहे? अन् त्याच्या पूर्ततेसाठी केलेले योग्य नियोजन, अविरत कष्ट, सातत्याने अंमलबजावणी, यामुळेच जीवन शक्तिशाली ठरते. यशस्वी आर्थिक जीवन साध्य करण्यासाठी पहिली पायरी म्हणजेच 'आर्थिक नियोजन' होय.

आपल्या जीवनातील भविष्यातील जीवनस्तरानुसार आर्थिक गरजा व ध्येय ठरविले पाहिजे. त्या ध्येयासाठी असलेल्या कालावधीनुसार अग्रक्रम ठरवा व वाढत्या महागाईनुसार किती रक्कम लागेल, याबाबत एक आराखडा तयार केला पाहिजे व आपण केलेल्या गुंतवणुकीचा वेळोवेळी आढावा घेतला पाहिजे. वाढत्या वयानुसार बदलणारे जीवनातील स्तर त्याप्रमाणे बदलणाऱ्या गरजा व वाढती महागाई या गोष्टी डोळ्यासमोर ठेवून आर्थिक नियोजन करावे, प्रत्येकाच्या वयानुसार बदलणारा जीवनस्तर पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| **1. Learner** | शिक्षण | **Earning** And Expensive Period |
| **2. Earner** | कमविणारा | |
| **3. Partner** | वैवाहिक जीवनात पदार्पण | |
| **4. Parents** | छोट्या चिमुकल्यांचे आगमन | |
| **5. Provider** | मुलांचे माध्य. शिक्षण, उच्च शिक्षण, लग्न इ. जबाबदारी | |
| **6. Empty nester** | रिकामेपणावरील जबाबदारीसाठी मोठे खर्च | |

## आर्थिक नियोजनातील महत्त्वाचे मुद्दे

१. आपल्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घ्या. वय, उत्पन्न स्थिर व अस्थिर (ॲक्टिव्ह इन्कम व पॅसिव्ह इन्कम) व येणाऱ्या उत्पन्नाचा कमी-जास्त होणारा कालावधी; त्याचबरोबर निरनिराळी दीर्घ व अल्पमुदतीची कर्जे, भविष्यात घ्यावी लागणारी कर्जे यांचा अंदाज घ्या.

२. स्वत:वरील जबाबदारी निश्चित करा. त्यामध्ये कौटुंबिक जबाबदारी व कर्जाची जबाबदारी निश्चित करा, जोखमीचे नियोजन करा, उत्पन्न, बचत, गुंतवणूक व खर्च यांबाबत सर्वांना विश्वासात घेऊन आराखडा तयार करा.

३. भविष्यातील आर्थिक गरजा व ध्येय धोरणे ठरवा. अल्पमुदत, मध्यम मुदत व दीर्घ मुदत अशा काळाप्रमाणे वाढत्या महागाईनुसार किती रक्कम कोणत्या वर्षी लागेल याचा निश्चित रकमेचा अंदाज घ्या.

४. आपत्कालीन व्यवस्था म्हणून आपल्या दरमहाच्या सहा महिन्याच्या उत्पन्नाइतकी रक्कम इमर्जन्सी फंड म्हणून तयार ठेवा.

५. काही अनपेक्षित घटनेमुळे आपले उत्पन्नच थांबले तर आपल्या कुटुंबावर येणाऱ्या परिस्थितीची कल्पना करा व आपल्या उत्पन्नाला पुरेसे संरक्षण द्या.

६. अल्पमुदत गरजांची गुंतवणूक करताना भांडवलाला सुरक्षिततेची जोड द्या.

७. मध्यम मुदतीच्या गरजांसाठी थोडीशी जोखीम स्वीकारा.

८. दीर्घ मुदतीच्या गरजांसाठी महागाई वरचढ परतावा मिळविण्यासाठी भांडवलाला वृद्धीची गरज भासते. त्यासाठी जोखीम स्वीकारा व वेळोवेळी आढावा घ्या.

## आर्थिक नियोजन कशासाठी...

१. आपल्या भविष्यातील स्वप्नास सत्यात उतरण्यासाठी.

२. आजच्या अस्थिरतेच्या वातावरणात समृद्धी टिकवण्यासाठी.

३. आपला आर्थिक भार इतरांवर न पडता कुटुंबामध्ये आर्थिक सक्षमता निर्मितीसाठी.

४. महागाई व चलनवाढीच्या समस्येवर मात करण्यासाठी.

५. आणीबाणीच्या परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी.

६. आर्थिक शिस्त आणि आर्थिक स्थैर्य पिढ्यान्पिढ्या टिकविण्यासाठी.

७. आयुष्यभराच्या जोडीदारास आर्थिक स्वावलंबी बनविण्यासाठी.

८. जीवनाची संध्याकाळ रम्यपणे सुख-समृद्धीत घालविण्यासाठी.

इजिप्तमधील पिरॅमिड कित्येक वर्षांपासून कित्येक वादळांमध्ये व भूकंपामध्येही आजसुद्धा सक्षमपणे उभे आहेत. कारण त्याचा पाया मजबूत आहे. मग आपल्या कुटुंबाचा पाया मजबूत करण्यासाठी प्रथम आपत्कालीन फंड, जोखीम व्यवस्थापन, ध्येय ठरविणे, रिटायरमेंट प्लॅनिंग व इस्टेट प्लॅनिंग याप्रमाणे नियोजन करावे. आपल्या जीवनामध्ये अनेक आर्थिक शिखरे गाठताना वरीलप्रमाणे नियोजन केल्यास आपला आपला आर्थिक पाया मजबूत होतो, ज्यामुळे आपली आर्थिक समृद्धी पिढ्यान्पिढ्या टिकून राहते. वरील प्रत्येक भागाची विस्तृत माहिती पुढील सत्रात दिली जाईल.

– श्री अनिल पाटील
मो. ९८५००८२८४९